Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं. ८३२–ए, फा. प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./परीक्षा–३/१६२०
पुणे – ४११००४
दिनांक – ०६/०५/२०२५

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय:–जून–जुलै २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांबाबत..

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रु.–मार्च २०२५ परीक्षेचा निकाल दिनांक ०५/०५/२०२५ रोजी ऑनलाईन जाहीर झालेला असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे पुरवणी परीक्षा जून–जुलै २०२५ मध्ये घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (फेब्रु.–मार्च २०२५ परीक्षेस प्रविष्ट न झालेले),व जुलै–ऑगस्ट २०२५ परीक्षेसाठी नावनोंदणी केलेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या, ITI विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत. सदर परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने इयत्ता १२वी साठी www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे –

शुल्क प्रकार	विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा	उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी RTGS/NEFT द्वारे रक्कम भरावयाची तारीख	उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी RTGS/NEFT पावती/ चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे जमा करावयाची तारीख
नियमित शुल्क	बुधवार, दिनांक ०७/०५/२०२५ ते शनिवार, दिनांक १७/०५/२०२५	शुक्रवार दि.२३/०५/२०२५ पर्यंत	सोमवार दि.२६/०५/२०२५
विलंब शुल्क	रविवार, दिनांक १८/०५/२०२५ ते गुरूवार, दिनांक २२/०५/२०२५		

सर्व विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे भरुन SUBMIT केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कॉलेज लॉगिन (College Login) मधून Pre-List उपलब्ध करुन दिलेली असेल, कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत उच्च माध्यमिक शाळा प्रमुख/प्राचार्य यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.

इ. १२ वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे स्वतंत्र उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशार्थ यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहेत –

१ ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना फेब्रु–मार्च २०२०, परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांनी त्या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन भरता येईल.

२ श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अटी व शर्तीनुसार श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या फेब्रु–मार्च २०२०, परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी जुन–जुलै २०२०, फेब्रु–मार्च २०२१ व जुन–जुलै २०२१ अशा लागलीच्या तीन संधी उपलब्ध राहतील, याची नोंद घ्यावी.

३ सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळाच्या अधिकृत Website द्वारे प्राप्त Online चलनावर नमूद केलेल्या ICICI बँकेच्या Virtual Account मध्ये दोणाऱ्या बँकेमधून NEFT/RTGS द्वारे चलनाप्रमाणे अचूक शुल्क रकमेचा भरणा करण्यात यावा व चलनाची प्रत व Pre-list वितरित मुदतीमध्ये विभागीय मंडळास जमा करावे. **रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामध्ये समाविष्ट सर्व विद्यार्थ्यांच्या application status मध्ये "Draft" चा "Send to Board" व Payment status मध्ये "Not Paid" चा "Paid" असा बदल आला आहे का** यांची खातरजमा करावी. अशा "Send to Board" व "Paid" Status प्राप्त झालेली आवेदनपत्रे मंडळास प्राप्त झाले असे गृहीत धरुन त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. व उर्वरित आवेदनपत्रे Draft Mode मध्येच राहतील व त्याबाबत कोणतीही कार्यवाही होणार नाही.

४ यापूर्वी बाबतीत अस्तित्वात असणाऱ्या Bank Of India HDFC Bank Axis Bank या खुल्या चलनाचा वापर करण्यात येऊ नये. त्यानुसार मंडळाकडे येणाऱ्या शुल्क स्विकारले जाणार नाही.

५ शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना उपलब्ध आवेदनपत्रांमधून विषय करुन एक किंवा एकापेक्षा अधिक तुकड्यांचे नियोजन करता येईल. परंतु शुल्क भरणा करताना प्रत्येक तुकडी स्वतंत्रपणे भरण्यात यावे. जेणेकरुन त्यात समाविष्ट विद्यार्थ्यांचे Status Update होईल.

६ परीक्षा शुल्क **NEFT/ RTGS** द्वारे भरणा केल्यानंतर सदर शुल्क पुनःस्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या खात्यावर जमा झालेले नाही व ते मंडळाच्या खात्यावर जमा/वर्ग झालेले आहे यांची खात्री करावी. **NEFT/ RTGS** द्वारे शाळेच्या खात्यात जमा झाल्याप्रकरणी मंडळास पुनःस्व परीक्षा शुल्क भरणा ज्या दिनांकास करण्यात येईल, तो दिनांक परीक्षा फी भरणा दिनांक म्हणून ग्राह्य धरण्यात येईल, त्या दिनांकाच्या विलंब अथवा अतिविलंब शुल्कासह परीक्षा फी भरली गणले जाईल, याची नोंद घ्यावी.

७ उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर केलेल्या सर्व आवेदनपत्रांचे विहीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांनी प्रवेशपत्रे उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत.

८ निर्धारित व विलंब शुल्काने आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

९ अतिविलंब शुल्काने आवेदनपत्रे भरण्याच्या तारखा यथावकाश कळविण्यात येतील.

उपरोक्त सर्व बाबी आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे –४

क्र.मुंविमं/उमाप/ 9995
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३
दिनांक 06 07 /२०२०

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्य. शाळा व कनिष्ट महाविद्यालये,
मुंबई /बृहन्मुंबई / ठाणे / पालघर /रायगड जिल्हे.

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापक / प्राचार्यांनी आपल्या स्तरावर नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

(ज्योत्स्ना पवार)
प्र. विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३

प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-
१ मा.शिक्षण उपसंचालक,मुंबई
२ शिक्षणाधिकारी (माध्य.) मुंबई / ठाणे ,रायगड .
३ शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई विभाग (पश्चिम/दक्षिण/उत्तर).
४ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय जव्हार/डहाणू/शहापूर/पेण/पालघर.
प्रत माहितीस्तव :- मा.सचिव, राज्यमंडळ,पुणे

Scanned with OKEN Scanner